# प्रकरण दुसरे

## संबंधित साहित्याचा अभ्यास

### 2.1 प्रास्ताविक –

" संशोधनाचा विषय शोधल्यानंतर तो निश्चित शब्दात लिहण्यापूर्वी व त्या विषयातील समस्येची अचूक लक्षणे ठरविण्यासाठी संशोधकाने त्या विषयाशी संबंधीत अशा शिक्षण व इतर शास्त्रांतील माहितीचा अभ्यास केला पाहिजे .

संशोधकाने आपल्या विषयाबाबतचे तत्वज्ञान , मानसशास्त्र, अध्यापनपध्दती, समाजशास्त्र या चार महत्त्वाच्या क्षेत्रातील ग्रंथांच्या अभ्यासाबरोबर पाठय व संदर्भपुस्तके त्यांचे मुलभूत अभ्यासकम, मूल्यमापनतंत्र यांचाही अभ्यास संशोधकाने करावयास पाहिजे. या साहित्याचा अभ्यास करताना संशोधकाने योग्य उतारे किंवा उता–यांचा सारांश यांची टिपणे करावयास पाहिजेत."[1]

"संशोधकाने संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर तो विषय नेमक्या शब्दात लिहिण्यापूर्वी त्या विषयासंबंधी सखोल माहिती संशोधकास हवी. त्या विषयाचे बारीक सारीक सर्व पैलू माहित असावयास पाहिजेत. संशोधन विषयावर प्रभुत्त्व प्राप्त केल्याखेरीज संशोधन प्रक्रिया सुरू करता येणार नाही. संशोधकाने संशोधनाकरिता जो विषय घेतलेला आहे त्या विशिष्ट विषयावर तत्पूर्वी संशोधन झालेले नसते. झाले असल्यास ते वेगळया परिस्थितीत, वेगळया काळात, वेगळया दृष्टिकोनातून झालेले असते, त्यामुळे त्या विषयाची संशोधकाची माहिती अत्यंत व्यवस्थित हवी, परिपूर्ण हवी, इतकेच नव्हे तर इतरांपेक्षा थोडी अधिक हवी. यासाठी संबंधित साहित्य व संशोधन अहवालांचे परिशीलन करण्याची आवश्यकता आहे.

संशोधकाने संशोधनास सुरूवात करण्यापूर्वी वरील प्रकारे जे साहित्य वाचले आहे त्या पायावर संशोधन प्रकियेची पुढील इमारत उभी राहणार असते. आपल्या संशोधनासाठी वरील पध्दतीनुसार कोणते साहित्य वाचणे आवश्यक आहे हे

---

1. भा. गो. बापट "शैक्षणिक संशोधन" पुणे : नूतन प्रकाशन, पुणे–30, तृतीय आवृत्ती 1988 पान नं. 61 व 191

संशोधकाने ठरवावे. आपल्या विषयाशी संबंधीत सर्व उपलब्ध साहित्य वाचावे. त्याचे मनन करावे व नोटस् काढून ठेवाव्यात त्यामुळे संशोधन अहवाल लेखन करताना शेवटपर्यंत अडचणी येत नाहीत. हे साहित्य उपलब्ध करण्यासाठी अनेक ग्रंथालयांना भेटी द्याव्यात. कारण संदर्भ साहित्याचा दर्जा जेवढा श्रेष्ठ तेवढे संशोधनाचे मूल्य वाढते."[2]

"कोणत्याही संशोधन कार्याला सुरूवात करण्यापूर्वी संशोधकाने निवडलेली समस्या प्रामुख्याने नवीन ज्ञानाच्या शोधासंबंधी असल्याची खात्री करून घ्यावी. संशोधकाने निवडलेल्या समस्येचे उत्तर कोणीतरी दुस–याने शोधून काढलेले नाही हे त्याला कसे समजणार ? त्यामुळे एखादा विषय कोणीतरी हाताळलेला आहे की नाही याबाबत निश्चितपणे माहिती होणे अगदीच कठीण आहे. तरीदेखील एखाद्या व्यक्तीने पूर्वी जे काम केले आहे त्याची मी जशीच्या तशी पुनरावृत्ती करीत नाही. कारण संशोधनाचा खरा आनंद नवीन काहीतरी चैतन्यमय करीत असल्याच्या भावनेत , श्रध्देत आहे.

व्यक्तीने जर निवडलेल्या विषयासंबंधी अस्तित्वात असलेल्या संशोधनाचा अधिकाधिक अभ्यास केला तर अधिक आत्मविश्वासाने समस्येसंबंधी त्याला अभ्यास करता येतो. संशोधनाच्या आराखडयामध्ये संबंधीत साहित्याचा अभ्यास असा एक विभाग असतो. हा आढावा घेतेवेळी संशोधक पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या समस्येशी संबंधीत वाडमयाचे सिंहावलोकन करतात. संशोधक अहवाल, जनरल्स, पुस्तके अशा वाडमयामध्ये अभ्यास विषयात साम्य, संबंध व अवलंबन विचारात घेतो त्यामुळे त्याचे अंतर्भूत घटकांचे आकलन वाढते, अचूक नेमके बनते. संशोधकाला प्रश्नाचे उत्तर शोधण्यास कृतीसाठी योग्य मार्गाचा, अधिक उपयोगी वा साधक मार्गाचा अवलंब करून घेण्यास उद्युक्त करतात.

---

2. डॉ.वि.रा. भिंताडे. "<u>शैक्षणिक संशोधन पध्दती</u>" पुणे : नूतन प्रकाशन, पुणे–30, प्रथमावृत्ती 1989 पान नं. 40

संबंधित साहित्याचा जर पध्दतशीर अभ्यास केला तर संशोधकाला दुस–या संशोधकाने याच्या सारखाच प्रश्न कसा हाताळला आहे हे समजते. समस्या कशी सोडवावी. कोणत्या पध्दती व तंत्रे वापरावीत याची सूचना मिळते. संशोधकाला माहीत नसलेली नवीन आधार सामग्री उपलब्ध होते. तसेच त्याच्या क्षेत्रातील माहित नसलेली अलौकिक व्यक्ती. तिचे कार्य यांचा परिचय होतो. संशोधकाला स्वतःच्या अभ्यासाची ऐतिहासीक पार्श्वभूमी समजते व तोच किंवा तत्सम प्रश्न सोडविण्यासाठी मदत होते. तसेच पूर्वी ज्ञात नसलेल्या नवीन संकल्पना व प्रणालींचे ज्ञान होते."[3]

"डयुईने केलेल्या विश्लेषणानुसार पूर्वी झालेल्या कार्याचे सर्वेक्षण म्हणजे संशोधन प्रक्रियेची तिसरी पायरी अशा प्रकारचा अभ्यास फार महत्वाचा असून त्यामुळे तुलनात्मक माहिती, उचित संशोधन पध्दती व कार्यक्षम तंत्राबददल निश्चित कल्पना प्राप्त होते. या संदर्भात खालील विधानात अधिक स्पष्टिकरण करण्यात आले आहे."

" The student should find, analyze and evaluate critically every pertinent research report dealing with his chosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific."[I]

" The review of the literature promotes a greater understanding of the problem and its crucial aspects and ensures the avoidance of unnecessary duplication. It also provides comparative data on the basis of which to evaluate and interprete the significance of one's findings. In addition in contributes to the scholarship of the investigator -- No experienced researcher would think of undertaking a study without acquainting himself with the contribution of previous investigators."[II]

पूर्वी झालेल्या कार्याचा शोध घेण्याकरिता दीर्घ प्रयत्न करावे लागत असले तरी त्यामुळे संशोधनाचे कार्य पध्दतशीर व सफल होण्यास मदत होत असते. इतर विषयांतील संशोधनाप्रमाणे शैक्षणीक संशोधनात सुध्दा संशोधकाला त्याच्या विषयाबददल अद्ययावत माहिती उपलब्ध असणे आवश्यक असते . अशाप्रकारची

---

3. प्रा. देशपांडे. "संशोधन प्रध्दती" नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक .5 प्रथमावृत्ती 1994 पान नं. 32

माहिती उपलब्ध असूनही संशोधकाने त्याकडे दुर्लक्ष करू नये कारण काही ठिकाणी अशी माहिती मिळणे अशक्य असते. "[4]

एकंदरीत संबंधित साहित्याचा अभ्यास म्हणजे संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार घेउन त्यापुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीमधील बदललेला अर्थ विशद करण्यासाठी संबंधीत संशोधन विषयाचा पाया भक्कम करण्यासाठी संबंधित साहित्याचे परिशीलन आवश्यक आहे, हे महत्वपूर्ण ज्ञान संशोधन विषयाच्या संबंधातील विविध ग्रंथामध्ये, लेखात उपलब्ध असते. त्यातील योग्य त्या घटकांचे, वाचन, चिंतन, मनन व उपयोजन म्हणजेच संबंधित साहित्याचे समीक्षण होय.

संबंधित साहित्याची माहिती अहवाल, ग्रंथ नियतकालिके इतर लोकांचे प्रबंध इत्यादीतून संपादन करावी लागते. वरील सर्व गोष्टी फायदेशीर ठरत असल्यामुळे संशोधकाला संशोधनाच्या अभ्यासामध्ये संबंधित साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक असते.

---

4. मुळे रा. श. उमाठे वि. तु. "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे" महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर. दुसरी आवृत्ती 1987 पान नं,

i) Whitney, F,L, The Elements of Research Prentice hall Inc. N.V.1954. P-98.

ii) Mouly op. Cit.p.112.

## 2.2. विविध आयोगांनी प्रौढ शिक्षणासंबंधी केलेले प्रयत्न

### अ. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा ठराव

### ("गोपाळ कृष्ण गोखले") 1910 –13 [5]

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर प्रथम उपस्थित करण्याचे श्रेय आधुनिक भारताचे शिल्पकार गोपाळ कृष्ण गोखले यांना द्यावे लागेल.

साक्षरतेवर भर :

1. प्राथमिक शिक्षणामुळे केवळ लिहायला आणि वाचायलाच येणार असले तरी साक्षरतेचा सार्वत्रिक प्रसार होणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. कारण निरक्षरतेपेक्षा साक्षरता केंव्हाही निःसंशय चांगलीच असते. म्हणून सर्व लोकांची निरक्षरता नाहीशी करणे हे फलित सामान्य म्हणता येणार नाही.
2. आपल्या देशातून निरक्षरतेचे निर्मूलन करणे हा सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा मुलभूत हेतू आहे. शिक्षणाची गुणवत्ता हा प्रश्न निश्चितच महत्वाचा आहे पण तो निरक्षरता नाहीशी झाल्यानंतरचा आहे.
3. शिक्षण प्रसाराबरोबर अन्याय आणि अडचणी, स्वार्थ आणि संघर्ष नाहीसे होणार नाहीत, त्यासाठी स्त्री–पुरूषांना आपल्या सर्व शक्तिनिशी लढावे लागणारच आहे. निरक्षरता नाहीशी होताच गरीबी दूर होण्यासाठी सामाजिक वा सार्वजनिक कार्य करावेच लागेल. परंतु सार्वत्रिक शिक्षणाचा लाभ झाल्यामुळे लोकांना जीवनाविषयी चांगली समज येईल. आर्थिक प्रगती, नैतिक विकास होईल. लोकांची पिळवणूक थांबेल.
4. निरक्षरता–निर्मूलन आणि जीवनमान सुधारणा यांसंबंधी गोखले यांनी भर दिला.

---

5. त्र्यं.र.देवगिरीकर अनुवादक रा.प्र.कानिटकर –
" आधुनिक भारताचे शिल्पकार गोपाळ कृष्ण गोखले" प्रकाशन विभाग माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार सन – 1971 पृष्ठ.130 ते 136

सक्तीच्या व सार्वत्रिक शिक्षणाची कल्पना सरकारने स्वीकारावी ही गोखल्यांची ठामपणे मागणी होती. त्याकरिता त्यांनी विस्तृत अशी कार्यपध्दती ही सुचविली. परंतु ती कोणी ध्यानात घेतली नाही.

सक्तीच्या व सार्वत्रिक शिक्षणासंबंधी गोखले यांनी राष्ट्रीय पातळीवर आवाज उठवून त्याचा पाठपुरावा करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर –

" प्रकाशाचा एखादा किरण, सुधारणेचा ओझरता स्पर्श, आशेचा अंधुक प्रकाश यांची आजच्या अज्ञानी जनतेला अतिशय गरज आहे. मला दूरवरचे पहायला मिळावे असे माझे मागणे नाही मला फक्त पुढचे पाउल टाकण्यापुरता मार्ग दिसला तरी पुरे आहे. "

आ. "प्रौढ शिक्षण सल्लागार समिती : इ.स.1936 "[6]

या समितीचे अध्यक्ष क्लिफर्ड मॅनशार्ट हे होते. लोकनियुक्त मंत्रिमंडळाने ही समिती नेमली. या समितीच्या शिफारशीनुसार सरकारने राज्य प्रौढ शिक्षण मंडळाची स्थापना केली. तिचे अध्यक्ष श्री.एस्.आर. भागवत होते. या समितीच्या आणखी एका शिफारशीप्रमाणे संस्था अगर व्यक्ती यांनी राज्यमंडळाकडे नोंदणी करून घेउन प्रौढशिक्षणाचे काम करावे त्यांना कामाबद्दल अनुदान ही दयावे असे ठरले.सध्याच्या काळात आर्थिक टंचाईमुळे प्रौढशिक्षणाचे काम साक्षरतेपुरते मर्यादित करावे अशीही समितीने सूचना केली. प्रौढ शिक्षणाला काही प्रमाणात या सूचनांमुळे गती मिळाली.

इ. "सार्जंट अहवाल – युध्दोत्तर विकास योजना : इ.स.1944"[7]

सर जॉन सार्जंट हा केंद्रीय सरकारचा शैक्षणिक सल्लागार होता. त्याला सरकारने युध्दोत्तर शैक्षणीक विकासासंबंधी एक योजना देण्यास सांगीतले व त्याने या अहवालात पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठ शिक्षणापर्यंतचा तपशील

6. श.कृ.सोहोनी "शैक्षणिक टीपाकोश" पुणे : प्रकाशक
सौ.सुधा शं. सोहोनी, पुणे – 30, प्रथमावृत्ती – 1993 पृष्ठ क्र.574

7 कित्ता, पान नं.578

असा वृत्तांत दिला आहे. एका अर्थाने राष्ट्रीय शिक्षणाचा हा एक विस्तृत व मार्मिक असा अभ्यास प्रथमच करण्यात आला आहे. त्यांच्या सूचनेत त्यांनी वीस वर्षात सर्वांना साक्षर करणे गरजेचे आहे असे सांगीतले होते.

भारतीय स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्योत्तर लोकशाहीचे भवितव्य चांगल्या सुजाण व शिक्षित लोकांवरचा अवलंबून आहे. सार्जंट अहवालामध्ये स्पष्ट म्हटले आहे की,

"The role of Adult education according to the report, is to make every possible member of a state an effective and efficient citizen and thus to give reality to the ideal of democracy."

ई. " भारतीय शिक्षण मंडळ : इ.स. 1964 "[8]

डॉ.डी.एस्.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग नेमण्यात आला. यामध्ये भारतीय व परकीय शिक्षणतज्ञ सदस्य म्हणून होते. श्री.जे.पी.नाईक हे

7. त्याचे सदस्य सचिव होते. या आयोगाने आपला अहवाल 1966 साली दिला. प्रौढ शिक्षणाबाबत केलेल्या शिफारशींमध्ये

1. निरक्षरता निर्मूलन 2. निरंतर शिक्षण
3. पत्राव्दारे अभ्यासक्रम 4. ग्रंथालये
5. विद्यापीठांची भूमिका 6. व्यवस्थापन व प्रशासन आदि बाबींबाबत सूचना केल्या आहेत.

उ. " राष्ट्रीय शैक्षणीक धोरण 1968 शिक्षणासंबंधी राष्ट्रीय धोरण"[9]

कोठारी आयोगाने शैक्षणिक विकास व उन्नतीसाठी काही मौलिक शिफारशी केल्या. त्यापैकी अत्यंत महत्वाची शिफारस म्हणजे भारताचे स्वतःचे

---

8 डॉ. आनंद वास्कर डॉ. पुष्पा वास्कर – "भारतीय शिक्षणाचे बहूजनीकरण" पुणे प्रकाशक, श्री.गो.के.जोगळेकर नूतन प्रकाशन, 2181 सदाशिव पेठ, पुणे–30 प्रथमावृत्ती – ऑक्टोबर 1998. पृष्ठ क्र. 263

9 कित्ता – पृष्ठ क्र. 283

राष्ट्रीय शैक्षणीक धोरण. गतिमान राष्ट्रासाठी सुदृढ , सुनिश्चित आणि नियोजनबध्द शैक्षणिक धोरणाची आवश्यकता आहे. 5 एप्रिल 1967 रोजी शिक्षणाचे राष्ट्रीय धोरण ठरविण्यासाठी संसद सदस्यांची एक समिती नियुक्त केली. त्याचे अध्यक्ष डॉ.त्रिगुणा सेन हे होते.

क. बहुतांश समाजाचे निरक्षरता निर्मूलन झाले पाहिजे. हे कार्य केवळ लोकशाहीतील सहभागासाठी नव्हे, तर उत्पादनातील गतीमानता (विशेषतः कृषी क्षेत्रातील) आणि राष्ट्रीय विकासाची गती अधिक तीव्र करण्यासाठी आवश्यक आहे. उद्योग, व्यापार व इतर सार्वजनिक क्षेत्रातील कामगांराची कार्यात्मक साक्षरता वाढविली पाहिजे. सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय सेवेचा एक भाग समजून शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी निरक्षरता निर्मूलनाच्या कामाला वाहून घेतले पाहिजे.

ख. तरुण शेतक–यांच्या शिक्षणावर, रोजंदारी करणा–या तरुणांच्या प्रशिक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. अशा सूचना या समितीने साक्षरता व प्रौढ शिक्षणाचा प्रसार याबाबत मांडल्या. "

उ. "उच्च माध्यमिक शिक्षणावरील राष्ट्रीय पुनरावलोकन समिती (आदिशेषया समिती ) 1978"[10]

ऑक्टोबर 1977 मध्ये केंद्रीय शिक्षण मंत्री डॉ.पी.सी.चंदर यांनी NCERT चे अध्यक्ष या नावत्याने मद्रास विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.माल्कम एस् आदिशेषया यांच्या अध्यक्षतेखाली उच्च माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन आणि व्यावसायिकरण व्हावे या हेतूने समितीची नियुक्ती केली. या समितीने प्रौढ शिक्षणासंबंधी पुढील शिफारस केली आहे. ' प्रौढ शिक्षणाच्या यशस्वी कार्यवाहीसाठी उच्च माध्यमिक शाळांची सक्रीय मदत घेणे आवश्यक. निरक्षर प्रौढांमध्ये जाणीव जागृती आणि कार्यात्मकतेचा विकास साधल्यास राष्ट्रीय विकासाला चालना मिळेल. '

---

10. कित्ता – पृष्ठ क्र. 292

ए. " राष्ट्रीय शैक्षणीक धोरण 1986 "[11]

भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी 5 जानेवारी 1985 रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणामध्ये राष्ट्राला वैज्ञानिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये एकविसाव्या शतकाकडे घेउन जाण्यासाठी सक्षम असे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देण्याचे अभिवचन दिले व त्यानुसार शिक्षण मंत्रालयाने शैक्षणिक आव्हान : एक धोरणात्मक यथार्थ दर्शन' हा अहवाल प्रसिध्द केला व त्याच्या निश्चितीसाठी 12 चर्चासत्रे 17 प्रायोजित चर्चासत्रे असे राष्ट्रव्यापी विचारमंथन झाले. नंतर 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 चा मसूदा' मे–1986 संसदेसमोर सादर करण्यात आला.

लोकसभेने 8 मे 1986 व राज्यसभेने 13 मे 1986 रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केला. त्यामध्ये प्रौढ शिक्षणासंबंधी पुढील शिफारस करण्यात आली.

" शिक्षणाच्या समान संधीपासून वंचित निरक्षर प्रौढांच्या शिक्षणाचा विचारही अत्यंत महत्वाचा आहे. प्रौढ शिक्षण कार्यक्रमात कौशल्यवृध्दी, गरिबी निवारण, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण समतोल, सृजनशीलतेला उत्तेजन, छोटया कुटुंबाचे महत्व आणि स्त्री–पुरुष समानता. "

तसेच प्रौढ व निरंतर शिक्षणाचा एक व्यापक कार्यक्रम आखून त्याची एक योजनाही आखण्यात आली.

ए. " राममूर्ती पुनरवलोकन समिती – इ.स.1990"[12]

" राष्ट्रीय शैक्षणीक धोरण– 1986" ची समीक्षा करण्याकरिता भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने मे 7 1990 रोजी एक पुनरवलोकन समिती नियुक्त केली. या समितीचे अध्यक्ष आचार्य राममूर्ती होते. या समितीने आपला अहवाल 26 डिसेंबर 1990 रोजी भारत सरकारकडे सादर केला. या समितीत एकूण 17 जण होते.

11. कित्ता – पृष्ठ क्र. 307

12. कित्ता. पृष्ठ क्र. 324

या समितीने, प्रौढांच्या मध्ये व्यावसायिक कौशल्यासाठी उपयुक्त कार्यक्रम तयार करण्यासाठी शिक्षण विभागाने ग्रामविकास विभाग आणि श्रम मंत्रालय यांच्याशी समन्वय साधला पाहिजे ! असे सुचविले.

ओ. " केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या धोरणविषयक अहवाल (जनार्दन समिती )सन–1992"[13]

" केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या 8–9 मार्च 1991 च्या बैठकीमध्ये राममुर्ती अहवालाच्या विचारार्थ स्वीकृत प्रक्रीयेची पडताळणी केली आणि असा निर्णय घेतला की शिफारशींवर विचार करण्यासाठी अध्यक्षांनी केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाची समिती नियुक्त करावी. 31 जुलै 1991 रोजी ही समिती नियुक्त केली. या समितीचे अध्यक्ष आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री श्री.एन्.जनार्दन रेडडी होते.

यामध्ये प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण आणि प्रौढ शिक्षण कार्यक्रम एकाच वेळी राबविताना शैक्षणिक नियोजनास सूचित करण्यासाठी दुहेरी दृष्टीकोन **'dual-track approach'** सुरु ठेवावा. महिला आणि अनुसूचित जाती–जमातींसारख्या सुविधांपासून वंचित वर्गाकडे विशेष लक्ष दयावे.

प्राथमिक शिक्षण घेतलेले युवक आणि नव साक्षर यांच्याकरिता उत्तर साक्षरता कार्यक्रम आणि निरंतर शिक्षण योजना राबवावी.

औ. "EIGHTH FIVE YEAR PLAN : 1992-97"[14]

Literacy programes will be launched in districts / regions which are educationally backword or have high concentration of SC/ST population or have low female literacy. By the close of the Eight Plan 345 districts including about two third of all districts in the educationally bacward states would be covered by total literacy (TL) compaigns while the centre based approach would be gradually phased out and confined to hilly, tribal and sparsely populated regions. The targets to be covered during the Eight plan will be about 10.5 crore (15-35 age group).

---

13. कित्ता. पृष्ठ क्र. 329

14. J.C.Agarwal " HANDMARKS IN THE HISTORY OF MODERN INDIAN EDUCATION." (Vikas Publishing House Pvt. Ltd. 1983) Page No.425

अ. "<u>1986 चे सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सन 1992</u>"[15]

1990 ची राममूर्ती पुनरावलोकन समिती आणि 1992 चा केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाचा धोरण विषयक अहवाल या दोन्ही समित्यांनी 1986 च्या धोरणामध्ये काही किरकोळ बदल करुन 1992 ला सुधारित राष्ट्रीय धोरण जाहीर झाले.

" प्रौढ शिक्षण कार्यक्रम अधिक यशस्वी झाला नाही ही खेदाची गोष्ट आहे. हा कार्यक्रम मूलतः एक मर्यादित उद्दिष्ट ठेवून सुरु झाल्याने कार्यक्रमाच्या लाभार्थी जनतेचा जीवनविषयक आणि आर्थिक स्तर उंचावण्यामध्ये तो असफल झाला आहे, त्यामुळे प्रौढ शिक्षणासंबंधी सर्व योजना आज कुचकामी ठरल्या आहेत. म्हणून या योजनांवर होणारा खर्च जर प्राथमिक शिक्षणावर केला तर फलनिष्पत्ती अधिक मिळेल अशी शिफारस केली आहे.

---

15. डॉ.आनंद वास्कर, डॉ.पुष्पा वास्कर "<u>भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण</u>" पुणे प्रकाशक – गो. के. जोगळेकर नूतन प्रकाशन, 2181 सदाशिव पेठ, पुणे – 30 पृष्ठ क्र. 336.

## 2.3 देशोदेशीचे प्रौढ शिक्षण :

जगातील महत्त्वाच्या देशांतील शिक्षण पध्दतींचा परिचय करुन देण्यात आला आहे. भारतीय शिक्षण डोळयांसमोर ठेवून इतर देशांतील शिक्षण पध्दतीची वैशिष्टये कटाक्षाने दिली आहेत. भारत हा एक विकसनशील देश आहे. भारतामध्ये भाषा, परंपरा, भौगोलिक परिस्थिती यामध्ये विविधता असली तरी शिक्षणाची रचना बहुतांश समान आहे. शिक्षण पद्धती एकमार्गी असून तत्वशः तिचा भर सर्वांना समान शिक्षण संधी देण्यावर आहे. भारताच्या घटनेत जरी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असले, तरी सर्वदूर त्याचा प्रसार म्हणावा तसा झालेला नाही.

### अमेरिका : प्रौढ शिक्षण [16]

अमेरिकेत प्रौढ शिक्षणाची सोय मोठया प्रमाणात आहे. कृषि, तांत्रिक, व्यवसाय, कला, गृहजीवन, नागरी जीवन इ. विषयांचे प्रगत ज्ञान देण्याची सोय आहे. 30 ते 45 या वयोमर्यादेतील लोक विशेषतः शिकतात. परंतु सर्व प्रौढांना हा शिक्षणक्रम खुला आहे. या कार्यक्रमात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व खाजगी संस्था भाग घेतात.

अमेरिकन शिक्षणाचा विशेष असा की ते आपल्या सारखे साचेबंद नाही की गतानुगतिक नाही. त्यांत प्रयोगशीलता आहे. माणसामधील गुंतवणूक म्हणून शिक्षणावर अमाप खर्च करण्यात येतो.

### ऑस्ट्रेलिया : प्रौढ शिक्षण [17]

व्यावसायिक अगर बिन व्यावसायिक शिक्षण प्रौढांना ही देण्याची व्यवस्था आहे. विद्यापीठांत निरंतर शिक्षणाद्वारे विनापदवी शिक्षण देण्याची सोय

---

16. शं.कृ.सोहोनी " शैक्षणिक टीपाकोश" पुणे : प्रकाशक सौ. सुधा शं. सोहोनी, पुणे–30, प्रथमावृत्ती,1993 पान नं. 594

17. कित्ता पान नं.602

आहे. राज्य सरकारने व खाजगी संस्था इंग्रजी भाषा वर्ग, साक्षरता वर्ग, माध्यमिक स्तरावरील अभ्यास वर्ग चालवितात. त्यामुळे घेउ न शकलेल्या विद्यार्थ्यांची सोय होते.

इराण : प्रौढ शिक्षण [18]

इराणमध्ये सुमारे 48 टक्के लोक साक्षर आहेत. लोकांना साक्षर करण्याकरिता निरनिराळे प्रयोग चालू आहेत. त्यामध्ये कार्यात्मक साक्षरतेवर भर देण्यात येत आहे.

इंडोनेशिया : समाजशिक्षण [19]

समाजशिक्षणाचा प्रचार देशात बराच झाला असून साक्षरतेचे प्रमाण 72 टक्के आहे.

ईजिप्त : लोक शिक्षण [20]

1944 च्या कायद्यान्वये 12 ते 45 वयांचे पुरुष व 12 ते 15 वयाच्या मुली यांना शिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे. सध्या साक्षरतेचे प्रमाण 40 टक्क्यांच्यावर आहे.

कॅनडा : प्रौढ शिक्षण [21]

निरंतर शिक्षण पध्दती सर्व स्तरांवर चालू आहे. पत्रव्यवहारपध्दती, सायंशाळा, प्रवासी ग्रथांलये, संग्रहालये, आकाशवाणी, दूरचित्रवाणी यामार्फत शिक्षण दिले जाते. प्रौढ शिक्षण कॅनडात अत्यंत लोकप्रिय झाले आहे. देशात संपूर्ण साक्षरता आहे.

---

18. कित्ता पान नं.603
19. कित्ता पान नं.603
20. कित्ता पान नं.603
21. कित्ता पान नं.603

कोरिया दक्षिण : प्रौढ शिक्षण [22]

कोरियात निरक्षरतेचे प्रमाण बरेच कमी, म्हणजे सुमारे आठ टक्के आहे, तरीही प्रौढांच्या शिक्षणाकरिता चाकोरीबाहेरील योजना आहेत. खेडयातील तरुण वर्गाकरिता अगर स्त्री वर्गाकरिता सायंकालीन वर्ग खेडयातील शाळेतचं घेण्यात येतात. याखेरीज दूरचित्रवाणीचा व आकाशवाणीचा शिक्षणाकरिता खास उपयोग केला जातो.

चीन : प्रौढ शिक्षण [23]

चीनमध्ये भारताप्रमाणेच हा प्रश्न बिकट झाला आहे. सुमारे 5 टक्के कामगार वर्ग आणि 30 टक्के तरुण व मध्यमवयीन शेतकरी अद्यापी निरक्षर आहेत. सुमारे दोन ते तीन वर्षात निरक्षरता नाहीशी करण्याचा चंग बांधला आहे.

जपान : समाज शिक्षण [24]

देशात 100 टक्के साक्षरता असली तरी अधिक शिक्षणाकरिता समाजशिक्षण वर्गही आहेत.

पाकिस्तान : प्रौढ शिक्षण [25]

सन 1981 साली साक्षरतेचे प्रमाण सुमारे 23 टक्के होते त्यात स्त्रियांचे प्रमाण सुमारे 11 टक्के होते. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत हा देश मागेच आहे. सन 1985 मध्ये साक्षरता 26 टक्के होती. धार्मीक शिक्षण सर्व शिक्षण संस्थात सक्तीचे आहे.

---

22. कित्ता पान नं.602
23. कित्ता पान नं.610
24. कित्ता पान नं.615
25. कित्ता पान नं.616

भारत : प्रौढ शिक्षण [26]

आज देशात 52.11 टक्के लोक साक्षर आहेत असे 1991 ची जनगणना सांगते. त्यातही पुरुषांचे प्रमाण 63.86 टक्के व स्त्रीयांचे प्रमाण 39.42 टक्के आहे. सन 1989 मध्ये राष्ट्रीय साक्षरता मिशनमार्फत 15 – 35 वयोगटातील स्त्री – पुरुषांची साक्षरता 1995 पर्यंत किमान 80 टक्के पर्यंत आणण्याकरिता प्रयत्न सुरु झाले. सन 1990 हे आंतरराष्ट्रीय साक्षरता" वर्ष होते. त्यानिमित्त राष्ट्रीय साक्षरता मिशनने साक्षरतेचा मोठा कार्यक्रम हाती घेतला. त्याकरिता सरकारने 550 कोटी रुपयांची तरतूद केली. भारतात साक्षरता मिशनने साक्षरता कार्यक्रम सुरु केला. 50 – 60 वर्षापासून भारतात साक्षरतेचे प्रयत्न चालू आहेत. परंतु अद्यापी 40.89 टक्के म्हणजे सुमारे एकेचाळीस कोटी लोक देशात निरक्षर आहेत. साक्षरतेची टक्केवारी वाढली तरी लोकसंख्येच्या बेसुमार वाढीने निरक्षर लोकांची एकूण संख्या वाढतच जात आहे.

रशिया : लोक शिक्षण [27]

लोक विद्यापीठांखेरीज, पत्रव्यवहार शिक्षण, सायंशाळा, अर्धवेळ शाळा, आकाशवाणी व दूरचित्रवाणीद्वारा आपले शिक्षण पुरे करतात.

श्रीलंका : प्रौढशिक्षण [28]

धंदेशिक्षण, हस्तकौशल्य, शालानाटय प्रौढांना शिकविले जाते. प्रौढ शिक्षण केंद्रात व्यक्तीमत्व विकासाकरिता व उत्पादक व्यवसायाकरिता शिक्षण दिले जाते. अशा प्रकारे देशात 87 टक्के साक्षरता आहे.

---

26. कित्ता पान नं.624

27. कित्ता पान नं.625

28. कित्ता पान नं.625

## 2.4 संबंधित संशोधनाचे परिशीलन

प्रास्ताविक :

संशोधकाने आपल्या विषयाची अंदाजे निश्चिती केली की, त्या विषयाबाबत या देशात वा परदेशात पूर्वी कोणी संशोधन केले आहे काय, याचा शोध घेउन त्या संशोधनाचा अभ्यास केला पाहिजे. संदर्भ संशोधनाच्या अभ्यासाने संशोधकास पूर्वीच्या संशोधनाचे स्वरुप समजते. जुन्याचीच पुनरावृत्ती केंव्हाही मान्य केली जात नाही व त्यास अर्थही नसतो. कारण नाविन्य हे संशोधन विषयाचे एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

त्या विशिष्ट विषय क्षेत्रात यापूर्वी जे संशोधन झालेले आहे त्याचा सविस्तर अभ्यास केल्याने संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा अचूक ठरविता येते. विविध संशोधनात वापरलेल्या कसोटया व पध्दती लक्षात घेतल्याने संशोधकास याचे मार्गदर्शन मिळते. या विशिष्ट विषय क्षेत्रात कोणते संशोधन झालेले आहे व कोणते अजून बाकी आहे हे समजते. तसेच परिकल्पना कशी तयार केली. नंतर जमविलेल्या माहितीचे विशदीकरण करुन निष्कर्ष व सूचना कोणत्या केल्या आहेत याची दखल घेउनच त्या गोष्टींची पुनरावृत्ती न होईल या विचाराने जुन्या संशोधनातील उपयुक्त ठरणा—या माहितीची, सूचनांची, निष्कर्षांची टिपणे संशोधकाने काढून आपल्या अहवालात सादर करणे जरुरीचे असते. संशोधन समीक्षणामुळे संशोधकास आपल्या विषयातील नाविन्यता काय आहे तिचा उपयोग हे मांडता येते.

संशोधिकेने प्रस्तुत समस्येबाबतच्या संबंधित संशोधनाचा अभ्यास करुन त्याची माहिती दिलेली आहे.

2.4.1. GANDIAN INSTITUTE OF STUDIES. Varanasi 1969
" VoluntaryAction for Adult Literacy." [1] Varanasi, 1069.

The aim of the investigation was to undertake a concurrent evaluation of the literacy project in action which was undertaken in the gramdan villages in each of the two districts of Darbhanga and Mirzapur.

One hundred schools in each of the two districts servel as sample of the study objective tests of literacy, reading speed comprehension and number concept were administered to the children. The data collected thus were statistically analyzed.

The findings of the study were :

i. The level of literacy among adults rose from seven percent to nineteen percent after the establishment of adult literacy classes in the villages concerned.
ii. Reading comprehension, and speed of learning showed a steady progress,and
iii. In comprehension Darbhanga learners had a distinct edge over their counter parts in Mirzapur District but no such disparity was evident in reading speed.

2.4.2. SHRI ABDUR RASHID : IMI 1966 (NCERT FINANECD)
"An inquiry into the problem of motivation for Adult literacy." ( JMI, 1966, NCERT Financed) [2]

The study attempted to measure an individuals motivation for literacy.

The dependent variables comprised

i. attainment and
ii. aspiration while the independent variables

Were

a) perception of the significance of literacy
b) value orientation
iii) change proneness and
iv) Souci-economic status.

The sample comprised a random selection of twenty percent villages of Delhi from each of these fifty four villages three percent,

---

1. M.B.Buch " A SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" 1974 (Abstract - 683)

i.e. 8954 house - holds in total were further selected at random. The persons selected in the process belonged to the age group 15-44 years which is generally considered to be significant for literacy. The final sample consisted of 442 persons - 252 males ; literate 116, illiterates 136 and 190 female literate 22, illiterates 168. The tests evolved by the Research and production center of Jamia Millia Ismlamia were adopted to study the attainment of neo-literates and a semi-structured projective technique developed by pareek and chattopadhyay was used to assess their levels of aspiration in the area of education as well as their change proneness and value orientation. The scale standardized by pareek and Trivedi was adopted to measure the socio-economic status of the subjects.

The study revealed that there is growing consciousness of being educational in the rural areas of Delhi. A close association between the socio-economic status and literacy was also discernible. The results suggest that literacy programmes, however well modeled, will have limited success if they fail to take into account the limitations imposed by socio-economic condition of life in particular.

2.4.3. HEBSUR R.K. AIKARA J. AND HENDRI QUESI S.J. (TISS : Mumbai : 1981) [3]

National Adult Education Program in Maharashtra; An evaluation unit for Research in the sociology of Education. TISS,Bombay, 1981.

The objectives of the study were to ascertain -

i) The socio-economic and ecological characteristics of the Adult Education Centers (AEC)
ii) The type of agencies running the AECs and the differences among them with regard to the characteristics and performance of the AECs,
iii) The socio-economic background and training of the instructors.
iv) The socio-economic background of the adults enrolled in the AECs,
v) The extent of drop-out from the programme and the reasons for the drop-out,
vi) The reasons for eligible learners not joining the centres.

---

2. M.B.Buch "SECOND SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" Volume II, 1972-78, (New Delhi : Published at the publication department by the secretary National Council of Educational Research and Trained Page No. 540

vii) The characteristics of the AECs as sociated with the importing of literacy, functionality and social awareness, and
viii) The socio-economic characteristics of the learners affecting the acquisition of literacy, functionality and social awareness.

The sampling of the districts was done by reporesenting all the four geographical regions of Maharashtra. A random sample of AECs stratified on the basic of the agencies running the centres was drawn. The AECs belonging to each strat were then allocated to the four regions in proportion to the size of the universe in each region within the region the allocation of the AECs run by each agency, to the districts was done in proportion to the size of the universe in each district. Then the required number of ABCs were drawn by the systematic random sampling method.

The major findings of the study were -

i. The majority of the AECs were located in villages which ranked low on the scale of exposure to modernization.
ii. Only one third of the AECs were located in school premises.
iii. One-fourth of the AEC instructors were women.
iv. Most of the instructions joined the programme out of a desire to participate in the development of the area.
v. Half of the instructors did not receive their remuneration regularly.
vi. As many as 93 % learners were in the age group 15-33, 28 percent were females, 49 percent belonged to weaker sections and 50 percent were landless.
vii. The major problem in setting up the AEC was getting proper premises.
viii. The AECs contributed to the learning of reading, writing and arithmetic skills.
ix. Favourably placed learners performed better in literacy.
x. The AEC contributed to raising the functionality level of the learners and disadvantageously placed learners gained more in this regard.
xi. The AEC played a positive role in enhancing the learner's social awareness and advantageously placed learners gained more.
xii. The AECs gave more emphasis to literacy than functionality and social awareness.

---

3. M.B.Buch " THIRD SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" Volume III, 1978-83, Abstract 1456.

2.2.4. POTDAR M.D. : Ph.D.Edu. Poona University, 1986

" Administration, Supervision & Monitoring of the Non-formal Adult Education Centres (Age-group 15-35) and to Evaluate Adult Education Learners" Ph.D.Edu. Poona University. 1986.

The objectives of the study were -

i) To compare formal, nonformal and incidental channels of education : to study the roles of important functionaries involved in conducting Adult Education Centres ( Instructors, Supervisors and others) to study the manner in which these functionaries were appointed and to make recommendations in the matter.

ii) To study the outline and policy of the National Adult Education Programme (NAEP) instituted in October 1978 and to study the manner in which Govt. Universities Voluntary agencies and colleges were participating in the programme through a survey of the administration, supervision and monitoring of the programme.

iii) To suggest ways and means to keep records and documents at different levels to make the programme more systematic and effective,

iv) To study the socio-economic status of the learners in Adult Education Centres and to study the planning of curriculum in Adult Education Centres.

v) To study how the villagers could participate in the Adult Education Programme and to make recommendations to make the programme people oriented,

vi) To understand the role of local managing bodies of the centres,

vii) To understand evaluation of the achievement of adults in the Adult Education Centres conducted by colleges and other organisations, and

viii) To study the manner in which the training of instructors, supervisors and college officers took place.

The major findings were :

1. Most of the instructors were males. They belonged to lower income groups. They were generally educated up to class VII. However, in college centres, some of them were educated up to class XII. The number of male instructors was predominantly greater than that of female instructors. In the Adult Education Centres for SCs and STs most of the instructors belonged to the same caste.

---

4. M.B.Buch " FOURTH SURVEY OF RESEARCH IN EDUCATION." 1983-88, Volume - II. Abstracts 1373.

2. In the government Adult Education centres appointment of supervisor's was done by the Regional deputy director of education, most of whom were trained graduates. However, while governement appointed full-time supervisor's most voluntary organization appointed part-time supervisors. In all the centres conducted by colleges, the supervisors were temporary.
3. In the programme of adult education it was envisaged that the local community would participate in the programme. On paper, there were committees at various levels national, state, district and local. These committees were constituted but their meetings were hardly held and as such there was no participation of the people in the running of the programme.
4. In NAEP documents, administrative machinery had been provided for monitoring and evaluation. However the nature of supervision, monitoring and evaluation in the government agency, private agency and the universities was different. In government centres, it was mostly bureaucratic, in voluntary agencies it was nonformal, while in the universities the entire success of administration depended on the principal and co-ordinating supervisor's of the programme.
5. The state resourses centre, Maharashtra had prepared a trol to evaluate the progress of leacher's. In most governement centres and university centres this tool was used. In centres conducted by voluntary agencies the evaluation was not systematic.
6. The training of supervisors and his officials was done by the state resourses centre, Maharashtra, while the training of instructors was done by the organizations locally, The training instructors was the weakest link in the programme.
7. A number of records had been prescribed by the state govenement for Adult education Centres. At most places these records was properly maintained. However, these records did not always tell the teck.

2.4.5. SINGH, T.R.Literacy in Two Indian villages, Literacy House, Lucknow, 1970 (Abstract - 1390)[5]

This is depth study was undertaken to find out what motivated adults to learn literacy skills and how they used these skills.

One of the villages was situated on the outskirts of Lucknow and the other in the interior where urban facilities were not easily available. Eight adults who had retained some degree of literacy in the former

5. M.B.Buch " FOURTH SURVEY OF RESEARCH IN EDUCATION." 1983-88, Volume - II. Abstracts 1390

village and size adults from the latter were made the subjects for indepth study. The case study method was employed.

The major findings were :

1. A large number of adults attending literacy classes in both the villages were in the age group of 15-50 years.
2. The adults selected for the case study belonged to middle caste groups.
3. They were motivated to be literates for varying reasons like, a) to write their names. B) to read sign boards or labels, c) to recite religious books or copy songs and sing them in singing partains and d) to derive benefits from literacy skills in their work.
4. They had put the literacy skills to work in their occupations or in areas of other intersets.
5. Agricultural labourers used their literacy skills to put their signatures on document or write their names.
6. Persons working outside the villages as masons carpenters attendants, etc. used the skills in their daily work, reading newspapers, writing letters. Young persons used them for reciting songs from books.

2.4.6 UMAYAPARVATHI, S, A STUDY OF Achievement motivation, Intelligence and Literacy Attainment in some of the Urban and Rural Women's literacy centres in TamilNadu and Pondicherry states. Ph.D.Adult Education, Madras, 1983. [6]

The purpose of this study was to investigate the psychological and social factors that contributed to higher levels of literacy attainment among women. The hypotheses framed related to finding out the relationship among literacy attainment, achievement motivation and intelligence. Social factors such as age marital status, urban and rural background, caste and religion were studied in relation to high and low attainers twelve hypotheses were framed and tested to study the above mentioned factors and their relationships.

A sample of 200 women learners in the age group of 15-35, 100 from urban areas and 100 from rural background was selected for the main study, the total population being 600 women who were at the end of their tenth month of literacy class in 20 literacy centres in urban and rural areas. On the basis of the guidelines provided by the directorate of Adult Education. Ministry of Education (1978) language and numeracy tests were

6. M.B.Buch " FOURTH SURVEY OF RESEARCH IN EDUCATION." 1983-88, Volume - II. Abstracts 1373.

developed by the investigator and scores on these tests were taken as literacy attainment scores. High and low attainment groups were classified as per the scores in these two tests, using median as the cut off point. Achievement motivation scores were collected through an adapted version of Murray's The matic Apperception test. Bhatia's Battery of performance test of intelligence was used to obtain scores on intelligence.

The major findings were -

1. Achievementmotivation and literacy attainment were not significantly related.
2. Intelligence had a positive and significant relationship with literacy attainment.
3. There was significant difference between the high and low attainers in terms of their achivement motivation and intelligence.
4. There was no significant difference in literacy attainment between the married and unmarried between the age group 15-24 and 25-36 and between Hindu muslim and christain women learners.
5. A significant difference was observed in literacy attainment between urban and scheduled class women lerners.
6. Among the psychological factors only intelligence influenced literacy attainment social factors, other than urban-rural background and community had no significant effect on literacy attainment.

2.4.7 DASH N. studied the problems of enrolling rural women in adult education centre (1991) [7] and found that the majority of the women learners belonged to the scheduled gropus, low down in the socio-economic scale, and faced social barriers like casteism untouchability and conservative, which gave them a sense of inferiority and resulted in lack of motivation and interest on the part of the learners. Only 60 % of the centres had some common teaching aids like chalk and board and only five percent were equipped with new teaching aids like radio sets, maps, globes, projectors etc. There was limited success achieved in literacy and numeracy.

The vital components of awarness and functional skills were completely neglected. The study cocludes that inadequate planning, poor delivery systems and lack of interst and motivation of learners are the factors of the continued problems of mass illteracy.

---

7. " FIFTH SURVEY OF EDUCATIONAL RESEARCH " 1988-92, Volume - I

## संदर्भ ग्रंथ सूची


1. Aggarwal J.C. : " HANDMARKS IN THE HISTORY OF MODERN INDIAN EDUCATION." (Vikas Publishing House Pvt. Ltd. 1983)
2. Buch M.B. : " A SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" 1974.
3. Buch M.B. : " SECOND SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" 1972-78.
4. Buch M.B. : " THIRD SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" 1978-83.
5. Buch M.B. : " FOURTH SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" 1983-88.
6. Buch M.B. : " FIFTH SURVEY OF RESEARCH IN EDUCATION" 1988-92.
7. श्री. बापट भा. गो : " शैक्षणिक संशोधन पध्दती" नूतन प्रकाशन पुणे – 30 तृतीय आवृत्ती. 1988
8. डॉ.भिंताडे वि. रा. : " शैक्षणिक संशोधन पध्दती" नूतन प्रकाशन पुणे – 30 प्रथम आवृत्ती. 1989
9. प्रा. देशपांडे : " संशोधन पध्दती " यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ , नाशीक – 5 प्रथम आवृत्ती. 1994
10. देवगिरीकर त्र्यं. र. : अनुवादक रा. प्र. कानिटकर " आधुनिक भारताचे शिल्पकार गोपाळ कृष्ण गोखले " माहिती व नभोवानी मंत्रालय. भारत सरकार. 1971
11. मुळे रा. शं., उमाठे वि. तु. : " शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे." महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ, नागपूर दुसरी आवृत्ती – 1987.
12. सोहोनी श. कृ. : " शैक्षणिक टीपाकोश" पुणे : प्रकाशक सौ. सुधा सोहोनी, पुणे – 30 प्रथमावृत्ती 1993.

13. डॉ.वास्कर आनंद,
वास्कर पुष्पा

: "भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण" प्रकाशक गो.के.जोगळेकर, नूतन प्रकाशन, पुणे–30 प्रथमावृत्ती 1998.